# घटक १ मध्ये जादाचा मजकूर

**भारतीय संघराज्याचे स्वरूप व वैशिष्ट्ये –**

संघराज्य म्हणजे केंद्रसरकार आणि घटकराज्याचे सरकार यांच्यात अधिकार वाटपाची व्यवस्था असून दोन्ही घटकांना स्वायतता दिली जाते. अनेक घटकराज्ये मिळून संघराज्य बनते. प्रत्येक घटकराज्याचे स्वतंत्र शासन असते. शिवाय संघराज्याचे एक केंद्र शासन असते. म्हणजेच संघराज्यात केंद्र-शासन आणि घटकराज्य शासन अशी दुहेरी शासन व्यवस्था असते. केंद्र सरकार व घटकराज्याचे सरकार यांचे अधिकार घटनेने ठरवून दिलेले असतात. भारत हे संघराज्य आहे असे सर्वसाधारणपणे म्हटले जाते. परंतु भारतीय संघराज्याच्या स्वरूपाबाबत राज्यशासनाच्या अभ्यासकांनी आणि घटनातज्ज्ञांनी वेगवेगळी मते मांडली आहेत. संघराज्यात केंद्रशासन आणि घटकराज्य शासन यामध्ये अशाप्रकारे अधिकार विभागणी करण्यात आलेली असते की प्रत्येक शासन आपल्या अधिकार क्षेत्रात स्वतंत्र व स्वायत असते हे दोन्ही घटक समान असतात.

भारतीय राज्यघटनेने संघराज्यात्मक शासन पध्दतीचा स्वीकार केलेला आहे. शासनाच्या दोन घटनात्मक पातळया, अधिकाराचे विभागणीलिखीत संविधान, स्वतंत्र न्यायमंडळ आणि द्विगृही कायदेमंडळ ही संघराज्याची वैशिष्ट्ये भारतीय शासन पध्दतीत आढळतात तसेच केंद्रशासन, केंद्र व घटकराज्य यांच्यासाठी एकच संविधान, एकेरी नागरीकत्व, घटकराज्याच्या अस्तीत्वाच्या हमीचा अभाव, एकात्म न्यायव्यवस्था, राज्यसभेत घटकराज्याला असमान प्रतिनिधीत्व, आणिबाणी विषयक तरतूदी इत्यादी अर्ध संघराज्याची वैशिष्ट्येही भारतीय संघराज्यात आढळून येतात म्हणून राज्यशास्त्रज्ञ के. सी. व्हीअर म्हणतात भारत हे अर्ध संघराज्य आहे.

भारतीय राज्यघटनेच्या पहिल्याच कलमात भारत हा एक राज्याचा संघ असेल 'India that is Bharat, shall be a Union of State' असा स्पष्ट उल्लेख आढळतो. या कलमातूनच भारतीय संघराज्याचे वैशिष्ट्येपूर्ण स्वरूप दिसून येते. 'Union' हा शब्द वापरण्यात आला आहे. कारण भारतीय संघराज्य हे अमेरिकन संघराज्य पध्दतीप्रमाणे म्हणजे केंद्राकर्षी स्वरूपाचे नाही तर ते केंद्रोत्सारी स्वरूपाचे आहे. डॉ. बी. आर. आंबेडकर म्हणतात, भारतीय संविधान द्विदल शासन पध्दती निर्माण करते त्यामुळे ते संघराज्यात्मक स्वरूपाचे आहे. संविधानाद्वारेच केंद्र व घटकराज्ये या दोन यंत्रणा निर्माण केल्या आहेत. म्हणजेच दोहोंना संविधानाद्वारेच आपली अधिसत्ता प्राप्त होते. दुसरी बाब म्हणजे भारताचे संविधान हे अंशत: ताठर व अंशत: लवचिक स्वरूपाचे आहे. म्हणूनच भारत हे संघराज्य आहे.

**संघराज्य निर्मितीसाठी आवश्यक अटी –**

संघराज्य निर्मितीची पध्दत, केंद्र व राज्य यातील अधिकार विभागणीची पध्दत, घटकराज्याना असलेली स्वायतता याबाबतीत काही देशामधील संघराज्य पध्दतीत फरक दिसून येतो. संघराज्य निर्माण होण्यासाठी काही किमान अटिची पूर्तता होणे आवश्यक असते. त्यांची पूर्तता झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने संघराज्य निर्माण होऊ शकत नाही. खालील प्रकारच्या अटि व पात्रता हे एखादे राज्य संघराज्य आहे किंवा नाही त्यांच्या कसोट्या मानता येतील.

**१. अधिकार विभागणी :–**

कोणत्याही राज्याच्या संघराज्याची पहिली अट अधिकारची विभागणी ही आहे. ही अधिकार विभागणी राज्यघटनेनी केलेली असावी लागते. संघराज्यात केंद्र सरकारकडून घटकराज्यांना अधिकार बहाल केलेले नसतात तर ते राज्यघटनेने दिलेले असतात.

**२. राज्यघटनेचे श्रेष्ठतव :–**

संघराज्यात केंद्र सरकार व घटकराज्य सरकार ही समान असतात. आणि त्याच्या अधिकराची विभागणी करणारी राज्यघटना श्रेष्ठ असते. राज्यघटनेने केलेला कायदा केंद्र–सरकार व राज्य सरकार यांना मोडता येत नाही. म्हणजेच घटनात्मक कायदयांना संघराज्यात श्रेष्ठ स्थान आहे.

**३. लिखीत व ताठर राज्यघटना :–**

केंद्र सरकार व घटक राज्य सरकार यांचे अधिकार लिखीत स्वरूपात असावे लागतात. संघराज्याची राज्यघटना लिखीत व ताठर स्वरूपाची असावी लागते. केंद्र व घटक राज्य सरकारची विभागणी सुस्पष्ट राज्यघटनेत असावी लागते.

**४. राज्यघटनेच्या संरक्षणाची तरतुद :–**

केंद्र सरकार व घटकराज्य यांच्याकडून आपल्या अधिकार क्षेत्राचे उल्लंघन केले जाण्याची शक्यता असते. अशा वेळी राज्यघटनेतील तरतुदीचा अर्थ लावण्याची जबाबदारी न्यायालयावर सोपविण्यात आलेली असते. याचाच अर्थ राज्यघटनेच्या संरक्षणाची तरतूद संघराज्यात असावी लागते. सर्वोच्य न्यायालय राज्यघटनेचे आणि संघराज्य व्यवस्थेचे संरक्षण करण्याचे कार्य करीत असते.

वेगवेगळ्या प्रादेशिक विभागांना सर्वांचे मिळून एकराज्य निर्माण करण्याची ईच्छा असणे पण त्याचबरोबर स्वत:ची स्वायतता टिकवण्याची प्रबळ ईच्छा असणे ही संघराज्य निर्मीती मागील प्रमुख प्रेरणा असते.

**संघराज्य निर्मीतीच्या पध्दती :–**

संघराज्याची निर्मीती दोन प्रकारे होत असते.

**१. केंद्राकर्षी :–** या संकल्पनेचा शब्दशः अर्थ केंद्राकडे आकृष्ट होणे होय. जेव्हा घटकराज्ये स्वतंत्रपणे अस्तित्वात असतात. संरक्षणासाठी किंवा अन्य कारणांमुळे त्यांना एकत्र येण्याची गरज निर्माण होते, असे निर्माण होणारे संघराज्य हे केंद्राकर्षी पद्धतीने निर्माण होते. उदा. अमेरिका

**२. केंद्रोत्सारी :–** जर अधी केंद्रसरकार अस्तित्वात असेलच आणि कोणत्याही कारणाने देशाचे निरनिराळे विभाग पाडले व त्यांना अधिकार दिले तर त्याला केंद्रोत्सारी संघराज्य म्हणतात. उदा. भारत.

**भारतीय संघराज्याची वैशिष्टये :–**

भारतीय संघराज्य असले तरी जगातील इतर संघराज्यापेक्षा भारतीय संघराज्य अनेक बाबतीत वेगळया स्वरूपाचे आहे. संघराज्यव्यवस्थेचे आदर्श स्वरूप म्हणून अमेरिकेचा उल्लेख केला जातो. त्याच्याशी तुलना करता भारतीय संघराज्याचे वेगळेपण तर अधिकच उठून दिसेल. अधिकाराची विभागणी व राज्यघटनेची सर्वेच्चता व स्वतंत्र न्यायमंडळ इत्यादी संघराज्याची वैशिष्टये व्यतीरिक्त भारतीय संघराज्याची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे पहाता येतील.

**१) अधिकार विभागणी :–**

भारतीय राज्यघटनेच्या ११व्या भागातील कलम २४६ मध्ये केंद्र सरकार व घटकराज्य सरकार यांच्यामध्ये तीन प्रकारचे अधिकार वाटप करण्यात आले आहेत. भारतीय संघराज्यात केंद्र सरकार व घटकराज्य सरकार यांना अधिकाराची विभागणी भारतीय राज्यघटनेनेच करून दिली आहे. भारतीय संघराज्यात मध्यवर्ती शासनसंस्थेच्या अधिकारात हस्तक्षेप करता येणार नाही म्हणजेच केंद्र सरकार व राज्य सरकार यानी आपापल्या अधिकार कक्षेत राहूनच राज्यकारभार करावयासाठी अधिकाराची विभागणी करण्यात आलेली आहे.

**२) दुहेरी शासनव्यवस्था :–**

कोणत्याही संघराज्यामध्ये दोन प्रकारच्या शासनव्यवस्था आढळून येतात. एक–संघराज्याची शासनव्यवस्था आणि दुसरी–घटकराज्याची शासनव्यवस्था दिसून येते. मध्यवर्ती शासनसंस्था केंद्र सरकार निहीत केलेली आहे. घटकराज्याची शासनसंस्था राज्यसरकारकडे निहीत केलेली आहे.

**३) सर्वश्रेष्ठ राज्यघटना :–**

भारतीय संघराज्य पध्दतीत भारतीय राज्यघटनेची सर्वोच्चता मान्य केलेली आहे. संघराज्य पध्दतीतील मध्यवर्ती सत्ता व घटकराज्याची सत्ता व या पेक्षा कोणतीही सत्ता राज्यघटनेला दुय्यम ठरते. प्रत्येक सत्तेवर राज्यघटना नियंत्रण ठेवत असते.

**४) संमिश्र संघराज्य पध्दती :–**

भारतीय संघराज्याची पध्दत अमेरिकेच्या संघराज्य पध्दतीसारखी नाही. अमेरिकेतील घटकराज्यानी एकत्र येऊन संघराज्य निर्माण केले. भारतीय संघराज्य बाबत अनेक घटनातज्ज्ञांनी भारतीय संघराज्य हे

संमिश्र स्वरूपाचे संघराज्य आहे असेही म्हटले आहे. तर के. सी. व्हीअर यांनी, ‘भारतीय संघराज्य हे अर्ध संघराज्य आहे संबोधले आहे.’

**५) एकेरी नागरीकत्व :–**

भारतीय संघराज्यात केंद्रसरकार व राज्यसरकार अशी दुहेरी शासनपध्दती स्वीकारली असली तरी एकेरी नागरीकत्वच स्वीकारले आहे. अमेरिकेसारखे केंद्राचे व राज्याचे अशा दुहेरी नागरीकत्वाचा प्रकार स्वीकारला नाही. भारतीय राज्यघटनेनी एकेरी नागरीकत्वाचे तत्व स्वीकारले आहे. आपल्या देशात व सर्व भारतीयांसाठी एकच नागरीकत्व देण्यात आले आहे. राष्ट्रीय एकता आणि राष्ट्राचे अखंडत्व टिकूण राहण्यासाठी एकात्म नागरीकत्वाचे तत्व स्वीकारण्यात आले आहे.

**६) केंद्राला झूकते माप :–**

भारतीय संघराज्यात केंद्र सरकार आणि घटकराज्ये यांच्यात अधिकाराची विभागणी करण्यात आली आहे. घटकराज्यापेक्षा केंद्र सरकारला अधिकच अधिकार देण्यात आलेला आहे. केंद्रसूचीत ९९ विषयाचा तर राज्यसुचीत ६१ विषयाचा समावेश करण्यात आलेले आहेत राज्यसूचीतील एखादया विषयावर कायदा करावा अशा आशयाचा ठराव राज्यसभेने बहूमताने संमत केल्यास तसा कायदा करण्याचा अधिकार केंद्र सरकारला प्राप्त होतो. दोन किंवा अधिक घटकराज्याच्या विधीमंडळाची राज्यसूचीतील एखादया विषयावर कायदा करावा अशा अशयाचा ठराव केला तर केंद्र सरकारला त्या राज्यापुरता कायदा करण्याचा अधिकार आहे.

समवर्ती सूचीतील एखाद्या विषयावर कायदा करण्याचा अधिकार केंद्र सरकार व घटकराज्य सरकार या दोहोंना आहे. परंतु त्यातील एखादया विषयी केंद्र सरकारने केलेला कायदा आणि घटक राज्यानी केलेला कायदा परस्पर विरोधी असेल तर अशा स्थितीत केंद्र सरकारचाच कायदा प्रमाण मानला जातो. अशा पदधतीने भारतीय संघराज्यात केंद्राला व्यापक अधिकार देण्यात आले आहेत.

**७) शेषाधिकार केंद्रसरकारकडेच :–**

भारतीय राज्यघटनेतील २४८ व्या कलमानूसार शेषाधिकार केंद्र सरकारकडे सोपविण्यात आले आहेत. संघराज्य पध्दतीत सर्वसाधारणपणे शेषाधिकार राज्यसरकारकडे देण्याचा कल असतो. परंतु भारतीय संघराज्य पदधतीत शेषाधिकार घटकराज्याकडे न देता केंद्रसरकारकडे देण्यात आले आहे.

**८) केंद्रसरकारचे प्राबल्य :–**

भारतीय राज्यघटनेने अधिकाराच्या विभागणीत केंद्रसरकारला झूलते माप दिलेले आहे. त्यामुळे राज्यकारभारात केंद्रसरकारचे प्राबल्य निर्माण झाले आहे. घटकराज्याची नावे, भौगोलिक सिमा बदलणे अशा विषयाचे अधिकार केंद्रांना देण्यात आले आहेत. राज्याची पूर्नरचना करणे, नव्या राज्याची निर्मीती करणे. राज्याच्या क्षेत्रफळात वाढ व घट करणे राज्यातील पाणी वाटपाचा प्रश्न, इत्यादी विषयी केंद्रसरकारच्या मर्जीवरच घटकराज्यांना आवलंबून रहावे लागते. घटकराज्यातील घटनात्मक प्रमुख म्हणजे राज्यपालाची

नेमणूक करणे, घटकराज्यानी तयार केलेल्या काही विधेयकांना राष्ट्रपतीची संमती घ्यावी लागते. म्हणजे कोणत्या ना कोणत्या मार्गानी घटकराज्याच्या राज्यकारभारावर केंद्रसरकार नियंत्रण ठेऊ शकते.

वरीलप्रमाणे भारतीय संघराज्याची वैशिष्टये पाहता येतील. भारतीय संघराज्य पध्दतीत इतर देशाच्या संघराज्यपध्दतीतील काही भाग पाहवयास मिळतो. तर काही भाग वेगळया पध्दतीचा पहावयास मिळतो उदा. घटकराज्याच्या अधिकाराचे संरक्षण करण्याचे जबाबदारी देण्यात आलेली नाही. सर्वसाधारणपणे संघराज पदधतीत अधिकाराच्या बाबतीत घटकराज्ये समान समजली जातात त्याकरीता संघराज्याच्या वरिष्ठ संभागृहात समान प्रतिनिधीत्व देतात. भारतात मात्र राज्यसभेत राज्याना समान प्रतिनिधीत्व देण्यात आलेले नाही तर लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्यात आलेले आहे.

भारताच्या एकात्मतेसाठी, राष्ट्रीय आखंडत्व, सार्वभौमत्व, बंधुता यासारख्या तत्वाचा पुरस्कार करून भारतीय संघराज्य पहायला मिळते. केंद्र आणि घटक राज्यसरकार यांच्यात अधिकारावरून जर कधी संघर्ष झाला तर त्यांना न्याय देण्यासाठी स्वतंत्र न्यायव्यवस्था स्वीकारली आहे. भारतीय नागरीकाच्या अधिकाराचे रक्षण करण्याची जबाबदारी भारतीय संविधानात पहायला मिळते.

❑❑❑

# घटक २ मध्ये जादाचा मजकूर

## २.२.३ निवडणूक प्रक्रिया, प्रतिनिधित्व आणि मतदान वर्तन निश्चितीचे सामाजिक घटक –

लोकशाहीमध्ये निवडणुकांना महत्त्वाचे स्थान आहे निपक्षपातीपणा व निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्य या बाबी लोकशाहीचा आधार आहेत. यातूनच भयमुक्त निवडणूका पार पाडल्या जाऊ शकतात. भारतीय शासनाच्या संदर्भात विचार करता आपण सर्वच पातळीवर निवडणुकीचे तत्व स्वीकारले आहे. आपल्या संविधानाच्या भाग १५, कलम ३२४ ते ३२९ यात एकात्मक स्वरूपाच्या निवडणूक यंत्रणेची तरतूद केलेली आहे. त्यानुसार केंद्रीय निवडणूक आयोग, राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. या आयोगाद्वारे भारतात निवडणुकीची प्रक्रिया पार पाडली जाते. भारतीय संविधानातील ही तरतूद इंग्लंडकडून स्वीकारली आहे. या सर्व बाबींचा विचार करता आपणास निवडणूक प्रक्रिया, प्रतिनिधित्व आणि मतदारांच्या वर्तन निश्चितीचे सामाजिक घटक समजावून घेणे गरजेचे ठरते.

### २.२.३.१ निवडणूक प्रक्रिया :–

भारतीय शासनव्यवस्थेत प्रौढ मताधिकार, प्रादेशिक मतदारसंघ अशा प्रमुख बाबी स्वीकारल्या आहेत. निवडणूक आयोग निवडणुकीची प्रक्रिया राबवितो. ही प्रक्रिया आपणास पुढीलप्रमाणे समजून घेता येते.

I. **निवडणूक अधिसूचना** – भारतात लोकसभेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रपतींकडून आणि विविध घटक राज्यातील विधानसभेच्या निवडणुकांसाठी संबंधित घटक राज्यांच्या राज्यपालांच्या शिफारशीने निवडणूक अधिसूचना जाहीर केली जाते. निवडणूक अधिसूचना जाहीर झाल्यानंतर निवडणुकीची अधिकृत प्रक्रिया सुरू होते. त्यानुसार निवडणुकांच्या (उमेदवारांचे अर्ज भरणे, मागे घेणे, छाननी करणे इत्यादी बाबीसाठी) तारखा व वेळ जाहीर केली जाते.

II. **नामांकन अर्ज भरणे** – भारतातील विविध निवडणुकांसाठी जे उमेदवार उभे राहू इच्छितात त्यांनी निवडणूक आयोगाचा विहित अर्ज म्हणजे 'नामांकन पत्र' भरावे लागते. या अर्जात उमेदवाराचे नाव, पत्ता व मतदार यादीतील क्रमांक अशा बाबींचा स्पष्ट उल्लेख करावा लागतो. उमेदवार ज्या मतदारसंघातून निवडणूक लढविणार आहे त्या मतदारसंघातील नोंदणीकृत मतदार यादीतील किमान दोन मतदारांनी सूचक व अनुमोदन देणे आवश्यक असते. तसेच उमेदवारांनी तिसऱ्या अनुसूचीमध्ये दिलेल्या नमुन्याप्रमाणे प्रतिज्ञापत्र भरून देणे आवश्यक असते. जे उमेदवार प्रतिज्ञापत्र भरून देत नाहीत, त्यांचा अर्ज छाननीमध्ये अवैध ठरविला जातो.

III. **अनामत रक्कम** – भारतातील कोणतीही निवडणूक लढवताना प्रत्येक उमेदवारास निवडणूक आयोगाने निश्चित केलेली अनामत रक्कम उमेदवारी अर्जासोबत भरावी लागते. लोकसभेच्या निवडणुकीसाठी सर्वसाधारण उमेदवाराला रुपये २५,०००, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमधील उमेदवारास

रुपये १२ऊ५०० इतकी रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागते. विधानसभेची निवडणूक लढविणाऱ्या सर्वसाधारण उमेदवार आज रुपये १०,००० तर अनुसूचित जाती व जमातीमधील उमेदवारास रुपये ५,००० इतकी अनामत रक्कम भरावी लागते. तर लोकसभेच्या व विधानसभेच्या निवडणुकीच्या निकालानंतर जे उमेदवार एक पंचमांश मते प्राप्त करतात त्यांना अनामत रक्कम परत दिली जाते. परंतु एक पंचमांश मतांचा कोटा पूर्ण न करणाऱ्या उमेदवारांची अनामत रक्कम जप्त होते.

IV. **उमेदवारी अर्जाची छाननी प्रक्रिया –** निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या अधिसूचनेनुसार ठरवून दिलेल्या तारखेला उमेदवारी अर्जाची छाननी होते. या छाननी प्रक्रियेमध्ये उमेदवाराने भरलेल्या अर्जात सर्व माहिती नियमानुसार भरली आहे किंवा नाही? उमेदवाराचे वय, अनामत रक्कम भरली आहे किंवा नाही ? सूचक व अनुमोदक आहेत किंवा नाहीत? या सर्वांची तपासणी केली जाते. तपासणीअंती उमेदवाराचा अर्ज वैध किंवा अवैध ठरविला जातो.

V. **निवडणूक प्रचार –** निवडणूक प्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे 'निवडणूक प्रचार' होय. प्रचाराच्या माध्यमातून प्रत्येक उमेदवार आपला हेतू, योजना, आराखडे मतदारांच्या समोर मांडतात. तसेच उमेदवार ज्या राजकीय पक्षाकडून उभा राहिला आहे त्या पक्षाचा जाहीरनामा व प्रचार यंत्रणा कार्य करताना दिसते. सध्या निवडणूक प्रचारासाठी सोशल मीडियाचा प्रचंड प्रमाणात वापर होताना दिसतो. निवडणूक प्रचारासाठी आयोगाकडून विशिष्ट खर्चमर्यादा व वेळेचे बंधन दिलेले असते. त्यांचे पालन करून उमेदवारांना प्रचार करावा लागतो.

VI. **आचारसंहितेचे पालन –** उमेदवारांना निवडणूक प्रचारासाठी निवडणूक आयोगाने आचारसंहिता घालून दिलेली असते. आचारसंहितेचे पालन करणे सर्व उमेदवारांवर व राजकीय पक्षांवर बंधनकारक असते. निवडणूक आचारसंहितेची सुरुवात निवडणुकीच्या घोषणेपासून होते. आचारसंहितेत कोणत्याही राजकीय पक्षाच्या उमेदवाराने धार्मिक स्थळांचा वापर निवडणुकीच्या प्रचारासाठी करू नये, धार्मिक, जातीय, वांशिक व भाषिक गटांमध्ये तेढ किंवा द्वेष निर्माण होईल अशी प्रक्षोभक भाषणे करू नयेत, सत्ताधारी पक्षाने निवडणूक प्रचारासाठी सरकारी यंत्रणा वापरू नये, निवडणुकीच्या घोषणेनंतर निवडणुका पूर्ण होईपर्यंत नवीन अनुदाने किंवा नवीन योजना जाहीर करू नयेत अशा अनेक बाबींचा समावेश आचारसंहितेमध्ये होतो.

VII. **निवडणूक खर्च मर्यादा** – निवडणूक आयोग आचारसंहितेनुसार प्रत्येक उमेदवारास आपल्या निवडणूक खर्चाचा हिशोब निवडणूक आयोगास सादर करण्याबाबत कळवितो. सर्व उमेदवारांनी तो खर्च ४५ दिवसाच्या आत आयोगाकडे सादर करणे बंधनकारक असते. खर्चाच्या पाहणीनंतर जर उमेदवाराने अपेक्षेपेक्षा जास्त खर्च केला आहे असे आयोगाच्या निदर्शनास आल्यास आयोग त्या उमेदवारास अपात्र घोषित करणे किंवा निवडणुका रद्द करणे अशी विविध प्रकारची कार्यवाही करू शकतो. सध्या मोठ्या राज्यांसाठी लोकसभेसाठी ९५ लाख रुपये, विधानसभेसाठी आता ४० लाख रुपये तर छोट्या

राज्यासाठी लोकसभा मतदारसंघात ७५ लाख, विधानसभा मतदारसंघात २८ लाख रुपये खर्च मर्यादा आयोगाने घालून दिलेली आहे.

**VIII. मतमोजणी व निकाल** – निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा म्हणजे 'मतमोजणी व निकाल' घोषित करणे हा होय. भारतात गुप्त मतदान पद्धतीने मतदान होते. वय वर्ष अठरा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरिकास संविधानाने मतदानाचा हक्क दिला आहे. सर्व मतदारांनी मतदान केल्यानंतर मतपेट्या सीलबंद करणे, त्या सुरक्षित ठेवणे, मतमोजणीच्या ठिकाणी वेळेवर पोहोचविणे ही जबाबदारी निवडणूक अधिकारी पार पाडत असतात. त्यानंतर मतमोजणी होऊन अंतिम निकाल जाहीर केला जातो. विजयी झालेल्या उमेदवाराची मते आणि इतर सर्व उमेदवाराना मिळालेली मते यांची घोषणा केली जाते. तसेच निवडून आलेल्या उमेदवारास त्याबाबतचे पत्र दिले जाते.

**IX. पुनर्मतदान** – निवडणूक प्रक्रियेत मतदान अत्यंत महत्त्वाचे असते. मतदानावेळी समाज विघातक घटकांनी जर मतदान केंद्रे ताब्यात घेतली असता, ईव्हीएम मशीन बंद पडले असता, तांत्रिक अडचणी आल्यास, उमेदवाराचा मृत्यू झाल्यास, मतदान केंद्रावर गैरप्रकार झाला असल्यास किंवा बोगस मतदान पकडले गेले असल्यास अशा विविध घटनांवेळी पुन्हा नव्याने मतदान घेतले जाते त्याला 'पुनर्मतदान' असे म्हणतात.

सारांश रूपाने पाहता भारतातील निवडणूक प्रक्रिया वरील प्रमाणे पार पडते. यावेळी निवडणूक आयोगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. कारण निवडणुकांचे संचालन करणे ही सर्वस्वी जबाबदारी निवडणूक आयोगाकडे असते. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया पार पडताना आयोगाला विविध कार्ये पार पाडावी लागतात. उदाहरणार्थ मतदार संघाची निर्मिती करणे, मतदार याद्या तयार करणे, मतदान केंद्राची व्यवस्था करणे, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, निकालानंतर त्याचा अहवाल तयार करणे, निवडणुकीत निर्माण झालेल्या वादाचे निराकरण करणे इत्यादी होय.

### २.२.३.२ भारतातील निवडणुकीची यंत्रणा.

भारतात सर्वच निवडणुकांचे संचालन केंद्रीय निवडणूक आयोगाच्या नियंत्रणाखाली चालते. केंद्रीय निवडणूक आयोग, राज्य निवडणूक आयोग व जिल्हा निवडणूक आयोग अशी एकात्मक स्वरूपाची निवडणूक यंत्रणा भारतात अस्तित्वात आहे. केंद्रस्तरावर केंद्रीय निवडणूक आयोग कार्यरत आहे. त्याचे प्रमुख मुख्य निवडणूक आयुक्त हे असतात, त्यांची नेमणूक राष्ट्रपती करतात. भारतातील सर्व निवडणुकांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे कार्य करतात. त्यांच्या मदतीला इतर निर्वाचन अधिकारी असतात. घटक राज्यातील निवडणुकांच्या संचालनासाठी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. तेथे राज्य मुख्य निवडणूक आयुक्त हे प्रमुख म्हणून राज्यातील निवडणुकांची प्रक्रिया पार पाडतात. त्यांची नेमणूक राज्यपालांकडून केली जाते. तर जिल्हा स्तरावरील निवडणुकांच्या संचालनाची जबाबदारी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यावर सोपविण्यात येते. त्यांच्या मदतीला स्वतंत्र नोकरवर्ग दिलेला असतो. तसेच मतदारसंघ स्तरावरसुद्धा निवडणूक यंत्रणा कार्यरत असते. निवडणुकीच्या काळात प्रत्येक मतदारसंघात निवडणूक

अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. निवडणूक अर्ज स्वीकारण्यापासून निवडणुकीचा निकाल घोषित करण्यापर्यंतची सर्व जबाबदारी ते पार पाडतात. अशा पद्धतीने भारतात निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोग ते मतदार संघ स्तरापर्यंत यंत्रणा कार्यरत आहे.

### २.२.३.३ निवडणूक प्रक्रियेतील दोष.

भारतीय संविधानाने प्रौढ मताधिकाराचे तत्व स्वीकारले असून 'एक व्यक्ती एक मत' असा समान मतदानाचा हक्क सर्व नागरिकांना बहाल केलेला आहे. भारतात गुप्त पद्धतीने मतदानाची प्रक्रिया पार पडते. या सर्व पार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक प्रक्रियेत काही दोष किंवा उणिवा आढळून येतात. त्याची चर्चा पुढील प्रमाणे करता येते.

१. भारतात बहुसंख्य लोक दारिद्र्य रेषेखाली आपले जीवन जगतात. असंख्य स्त्रिया, आदिवासी व कनिष्ठ जातीतील लोक आर्थिक, सामाजिक दबावाखाली जीवन जगताहेत. परिणामी ते स्वतंत्रपणे व स्वविवेक बुद्धीने मतदान करू शकत नाहीत.

२. निवडणूक प्रक्रियेतील दुसरा महत्त्वाचा दोष म्हणजे 'मतपेट्यांची असुरक्षितता' होय. बहुतेक वेळा मतपेट्या किंवा ईव्हीएम मशीन पळविणे, मतदान केंद्रे ताब्यात घेणे, बोगस मतदान करणे असे अनेक गैरप्रकार होताना दिसतात. तसेच आज ईव्हीएम मशीनशी छेडछाड करणारी प्रकरणेसुद्धा समोर येत आहेत. थोडक्यात मतपेट्यांची सुरक्षितता महत्त्वाची आहे.

३. निवडणुकीत राखीव जागांचे अपवाद वगळता सर्वसाधारण जागांवर उच्चवर्णीय व्यक्तींची मक्तेदारी दिसते.

४. निवडणूक प्रक्रियेमध्ये निवडणूक खर्चात अलीकडील काळात बेहिशोबी वाढ झाली आहे. ग्रामपंचायत ते लोकसभेच्या निवडणुकीपर्यंत उमेदवाराकडून प्रचंड प्रमाणात पैसा खर्च केला जातो.

थोडक्यात निवडणूक प्रक्रियेमध्ये अशा काही उणिवा जाणवतात. त्या दूर करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. अन्यथा त्याचा परिणाम मतदानावर होऊन मतदारामध्ये प्रचंड उदासीनता वाढत जाईल असे वाटते. तर जनतेचा राजकीय सहभाग कमी होत जाऊन प्रतिनिधींचे हितसंबंध जोपासले जातील. ही बाब लोकशाहीला मारक ठरू शकते. म्हणून निवडणूक प्रक्रियेत सुधारणा होणे गरजेचे आहे.

### २.२.३.४ प्रतिनिधित्व आणि मतदान वर्तन निश्चितीचे सामाजिक घटक.

लोकशाहीमध्ये निवडणूक प्रक्रियेप्रमाणेच 'प्रतिनिधित्व' हा घटक अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो. निवडणुकांच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी निवडले जातात. निवडून दिले जाणारे लोकप्रतिनिधी कार्यक्षम, प्रामाणिक, विश्वासू व जनमताची कदर करणारे असावेत अशी जनभावना असते. त्यामुळे प्रतिनिधित्व व मतदान वर्तन निश्चितीमधील सामाजिक घटक या संकल्पना समजावून घेणे क्रमप्राप्त ठरते. आधुनिक लोकशाही ही 'प्रतिनिधिक लोकशाही' म्हणून ओळखली जाते. आज लोकशाहीतील निर्णय प्रक्रियेत संपूर्ण जनतेला सामावून घेणे शक्य नाही, त्यामुळे जनतेने आपल्यातून काही लोकांना राज्यकारभार करण्यासाठी

प्रतिनिधी म्हणून निवडून दिले. त्या निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी जनतेला जबाबदार राहून जनकल्याणाला प्राधान्य देत राज्यकारभार करणे अपेक्षित असते. तर प्रतिनिधी निवडून देत असताना मतदारांच्या वर्तनावर विविध बाबी आपला प्रभाव पाडत असतात त्याला 'मतदान वर्तन निश्चितीचे घटक' असे म्हणतात. यावर गार्डन मार्शल असे म्हणतात की, 'मतदान वर्तनाच्या पद्धतीत लोकांच्या मतदानाचे निकष आणि असे मतदान करण्यासाठीच्या त्यांच्या निर्णय प्रक्रिया यांचे अध्ययन केले जाते'. थोडक्यात मतदान प्रक्रियेवर विविध सामाजिक घटक आपला प्रभाव पाडत असतात. त्यातून मतदान निश्चितीचे घटक ठरतात. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे आहे.

**१. धार्मिकता व जातीयता** – भारतात हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, पारशी, बौद्ध व जैन अशा अनेक धर्माचे लोक राहतात. बहुतेक धर्मात जाती-पोटजाती आढळून येतात. तर प्रत्येक धर्म व जातीला समाजाशी जोडणारा एक घटक समाजात कार्यरत असतो. निवडणूकांवेळी धर्माच्या व जातीच्या नावाखाली लोकांना एकत्रित केले जाते. तेथे जात व धर्माचा प्रचार करून आपला प्रतिनिधी विधिमंडळात किंवा मंत्रिपदापर्यंत जाणे कसे गरजेचे आहे? याची मांडणी केली जाते. थोडक्यात निवडणुका लढवताना प्रतिनिधीकडून धर्म व जातीचा आधार घेतला जातो. त्या आधारावर जनसंघटन केले जाते. उदाहरणार्थ – मुस्लिमानी स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या रक्षणासाठी 'मुस्लिम लीग'ची स्थापना केली. त्याला शह देण्यासाठी 'हिंदू महासभा' स्थापन झाली. शीख धर्माच्या रक्षणासाठी 'अकाली दल' हा पक्ष स्थापन झाला. पश्चिम बंगालमध्ये ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पार्टी स्थापन झाली. थोडक्यात भारतात विविध राज्यात आपल्या धर्माच्या व जातीच्या आधारावर लोकप्रतिनिधींनी जनसंघटन केले आहे. त्याचा परिणाम आज मतदान प्रक्रियेवर होताना दिसतो.

**२. भाषा –** जात व धर्माप्रमाणे मतदान प्रक्रियेवर 'भाषा' हा घटक प्रभाव टाकतो. कारण भाषा हा घटक समाजाला जोडण्याचे व विभाजन करण्याचे काम करतो. भारतात विविध भाषिक राज्यात इतर भाषेचे अल्पसंख्यांकही राहत आहेत. त्यांना त्यात्या राज्यात संख्येने कमी असल्यामुळे असुरक्षित वाटते. परिणामी निवडणुकीवेळी, प्रतिनिधी निवडताना किंवा मतदान करताना भाषिक अल्पसंख्यांक लोक अशा उमेदवारास निवडतात किंवा पाठिंबा देतात की जो त्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करू शकेल असे त्यांना वाटते. शिवाय आज भाषेच्या आधारावर काही राजकीय पक्ष अस्तित्वात आले आहेत. उदाहरणार्थ द्रविड मुन्नेत्र कळघम. द्रमुक पक्षाने नेहमीच हिंदी विरोधी भूमिका घेतलेली आहे. महाराष्ट्रात मराठी जोपासण्याचे काम शिवसेना व महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाकडून होताना दिसते. तर आसाममध्ये आसाम गण परिषद, तेलगू भाषेच्या रक्षणासाठी आंध्र प्रदेश मध्ये तेलगू देसम पार्टी असे अनेक राजकीय पक्ष उभारले आहेत. थोडक्यात भाषेमुळे मतदारांच्या वर्तनावर परिणाम होत आहे. म्हणजेच मतदान निश्चिती प्रक्रियेमध्ये भाषा हा घटक प्रभाव पडताना दिसतो.

**३. प्रादेशिकतावाद –** भारतीय राजकारणात दुसऱ्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर प्रादेशिकतावाद निर्माण होत गेला. सध्या त्याचा परिणाम मतदान वर्तनावर होताना दिसतो. प्रादेशिकतावादात संकुचित निष्ठा ठेवून विविध लोकप्रतिनिधी व काही राजकीय पक्ष प्रचार करतात. त्यातून भूमिपुत्रांची

संकल्पना किंवा आदिवासीवाद किंवा प्रादेशिक अस्मिता अशा अनेक बाबी पुढे येत आहेत. आसाम गण परिषद, तेलगू देसम पार्टी, नॅशनल फ्रंट, नागा नॅशनल ऑर्गनायझेशन, मणिपूर पीपल्स पार्टी असे अनेक प्रादेशिक पक्ष प्रादेशिक अस्मिता जोपासून मतदान वर्तनास प्रभावित करीत आहेत.

४. **विचारसरणी –** विविध प्रकारच्या विचारप्रणाली मतदान वर्तन निश्चितीत महत्त्वाची भूमिका पार पाडतात किंवा आपला प्रभाव पडताना दिसतात. काही मतदार विशिष्ट विचारप्रणालीशी प्रतिबद्ध किंवा जवळीकता पाळणारे असतात. प्रतिनिधींकडून मतदान वर्तन प्रभावित करण्यासाठी आपणही त्याच विचारसरणीशी बांधील असल्याचा दावा केला जातो. तर अनेक मतदार आपल्या विचारसरणीशी मिळतेजुळते धोरण राबविणाऱ्या राजकीय पक्षांना किंवा उमेदवारांना मतदान करीत असतात. उदाहरणार्थ केरळ, पश्चिम बंगाल व त्रिपुरा या घटक राज्यांमध्ये अनेक लोक डाव्या विचारसरणीशी कटीबद्ध आहेत. त्यामुळे ते नेहमी कम्युनिस्ट पक्षाला मतदान करताना दिसतात.

५. **दिव्यवलयी नेतृत्व –** दिव्यवलयी नेतृत्वामुळे मतदान वर्तन निश्चित होत असते. नेतृत्वाचे गुण, नेतृत्वाचे कौशल्य, व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव यांची छाप मतदारांवर पडत असते. त्यातून मतदान वर्तन निश्चित होते. उदाहरणार्थ – १९४७ ते १९६४ पर्यंत पंडित नेहरू यांच्या व १९७५ ते १९८४ पर्यंत श्रीमती. इंदिरा गांधी यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे कॉंग्रेस पक्षाला यश मिळाले. २०१४ व २०१९ या निवडणुकांत नरेंद्र मोदी यांनीही आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप पाडून मतदान वर्तन प्रभावित केले आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात विचारकरता शरद पवार, बिहारमध्ये नितीश कुमार, तमिळनाडूमध्ये जयललिता, पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी व अलीकडील काळात दिल्लीमध्ये अरविंद केजरीवाल या दिव्यवलयी नेत्यांनी मतदान वर्तन प्रभावित केल्याचे दिसते. थोडक्यात नेतृत्व हा मतदान वर्तन निश्चितीत महत्त्वाचा घटक आहे.

६. **सामाजिक प्रश्न** – निवडणुकांवेळी मतदारांचे मतदान वर्तन निश्चित होत असते. त्यात विविध सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्नांचा प्रभाव पडलेला दिसतो. सध्यकाळात मतदार सामाजिक समस्या सोडविणाऱ्या उमेदवारास व राजकीय पक्षास मतदान करताना दिसतात. उदाहरणार्थ – १९७१ च्या निवडणुकीवेळी श्रीमती. इंदिरा गांधी यांनी 'गरिबी हटाव' असा नारा दिला. त्यांनी गरिबी या सामजिक प्रश्नाकडे लक्ष वेधले. १९८० मध्ये आसाम राज्यात परकीय नागरिकांचा प्रश्न निर्माण झाला. तसेच बहुसंख्यांकांचे सामाजिक मागासलेपण अशा अनेक बाबींचा प्रभाव मतदान वर्तनावर होताना दिसतो. थोडक्यात सामाजिक प्रश्नांमुळे मतदान वर्तन प्रभावित होत आहे.

७. **गुन्हेगारी प्रवृत्ती –** १९८९ नंतरच्या अनेक निवडणूकात गुंडगिरी किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ झाली आहे. परिणामी मतदान वर्तन प्रभावित होताना दिसते. उदाहरणार्थ – उत्तर प्रदेश व बिहार या राज्यात राजकीय पक्षांकडून गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना निवडणुकीत उमेदवारी दिली जाते. त्यातून गुंडगिरी करणारे लोक समाजात आपला दबाव निर्माण करून मतदान वर्तन प्रभावित करतात. गेल्या चार दशकात तर गुन्हेगारी प्रवृत्तीत प्रचंड वाढ होऊन निवडणूक यंत्रणेवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

अशा अनेक सामाजिक घटकांमुळे मतदान वर्तन प्रभावित होताना दिसते. तसेच निवडणुकांमध्ये होणारा पैशाचा गैरवापर, सत्ताधारी पक्षाची कामगिरी, अल्पसंख्यांकांची असुरक्षितता, निवडणुकांतील प्रचार, प्रसार माध्यमांची भूमिका अशा अनेक घटकांमुळे सुद्धा मतदान वर्तन निश्चिती व प्रभावित होताना दिसते.

## २.४. पारिभाषिक शब्द व शब्दार्थ : –

१. **मतदान वर्तन** – निवडणुकांमध्ये मतदार मतदान कसे करतात आणि तसे मतदान करण्याची कारणे किंवा प्रक्रिया समजावून घेणे म्हणजे मतदान वर्तन होय.

२. **आचारसंहिता** – निवडणुका खुल्या व न्याय्य वातावरणात होण्यासाठी निवडणूक आयोगाने स्वतंत्रपणे ज्या उपाययोजना राबवल्या आहेत, जे नियम तयार केले आहेत त्यास आचारसंहिता असे म्हणतात.

## २.५. स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे : –

**योग्य पर्याय निवडा**

१. भारतीय संविधानाच्या ........... कलमात एकात्मक स्वरूपाच्या निवडणूक यंत्रणेची तरतूद केली आहे.

अ) कलम ३४२ ते ३९२ ब) कलम २३४ ते २३९

क) कलम १४२ ते १९२ ड) कलम ३२४ ते ३२९

२. भारतात केंद्रीय निवडणूक आयोगाची स्थापना ........... मध्ये झाली.

अ) २५ जानेवारी १९४७ ब) २६ जानेवारी १९५०

क) २५ जानेवारी १९५० ड) २६ नोव्हेंबर १९४९

३. लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत किमान ........... मते मिळविणाऱ्या उमेदवाराची अनामत रक्कम जप्त होत नाही.

अ) १/५ ब) २/३ क) १/१० ड) १/३

४. घटक राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांची नेमणूक ............ यांचे कडून केली जाते.

अ) राष्ट्रपती ब) पंतप्रधान क) मुख्यमंत्री ड) राज्यपाल

**उत्तरे :–**

१. ड) कलम ३२४ ते ३२९ २. क) २५ जानेवारी १९५०

३. अ) १/५ ४. ड) राज्यपाल

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :–

प्रश्न १. भारतातील निवडणूक प्रक्रिया विशद करा.

प्रश्न २. प्रतिनिधित्व आणि मतदान वर्तन निश्चितीचे सामाजिक घटक स्पष्ट करा.

प्रश्न ३. भारतातील निवडणूक प्रक्रियेतील दोष किंवा उणिवांची चर्चा करा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ :–


१. डॉ. अलका देशमुख, भारतीय लोकशाहीची प्रक्रिया, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२. डॉ. प्रशांत विघे व धर्मेंद्र तेलगोटे, लोकशाही निवडणूक प्रक्रिया आणि सुशासन, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३. M. Laxmikant, Indian Polity, McGraw Hill Education Private Ltd, Hyderabad, India.


❑❑❑

## घटक ३

# आम आदमी पार्टी

(Aam Aadmi Party)

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ आम आदमी पार्टीची ध्येय-धोरणे-उद्दिष्टे

  ३.२.२ आम आदमी पक्षाची विचारसरणी

  ३.२.३ आम आदमी पक्ष-राष्ट्रीय पक्ष

  ३.२.४ राष्ट्रीय दर्जा प्राप्त झालेल्या पक्षाला मिळणारे फायदे

  ३.२.५ आम आदमी पक्षाची निवडणुकांमधील वाटचाल

    ३.२.५.१. तक्ता क्र.१. तक्ता क्र.२. तक्ता क्र.३. तक्ता क्र.४.

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व अर्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्न व त्याची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास

१) आम आदमी पक्षाच्या उदयाची पार्श्वभूमी समजून येते.

२) आम आदमी पक्षाची राजकीय वाटचाल समजून येते.

३) आम आदमी पक्षाची ध्येय-धोरण समजून येतात.

४) आम आदमी पक्षाची विचारसरणी समजून येते.

५) आम आदमी पक्षाच्या निवडणुकांमधील यशापयशाची वाटचाल याविषयी माहिती मिळते.

## १.१ प्रास्ताविक :

आम आदमी नावाचा अवघ्या १० वर्षाचा प्रादेशिक पक्ष ते राष्ट्रीय पक्ष असा दर्जा प्राप्त केलेला भारतातील एक महत्त्वाचा राजकीय पक्ष म्हणून ओळखला जातो. भारतात भ्रष्टाचारविरोधी कठोर कायदा लागू करण्यासाठी तसेच लोकपाल विधेयक मंजूर व्हावे यासाठी भारत सरकारवर दबाव आणण्यासाठी २०११ साली “India Against Corruption’ हे राष्ट्रव्यापी जन आंदोलन उभारण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्त्व अण्णा हजारे, अरविंद केजरीवाल, मेधा पाटकर, किरण बेदी, अग्निवेष, शांतीभूषण, संतोष हेगडे, योगेंद्र यादव, प्रशांत भूषण, मनिष सिसोदिया आदींनी केले.

## १.२ विषय विवेचन :

लोकपाल विधेयक मंजूर करण्यासाठी भारतीय राजकीय पक्षांनी प्रदर्शित केलेल्या उपेक्षापूर्ण वागणुकीमुळे राजकीय पर्यायांचा शोध घेतला जाऊ लागला. अण्णा हजारे भ्रष्टाचार विरोधी जनलोकपाल आंदोलनाला राजकारणापासून दूर ठेवण्याचा प्रयन्त करत होते. तर अरविंद केजरीवाल आंदोलनाचे लक्ष्य प्राप्त करण्यासाठी एक वेगळा पक्ष स्थापनेच्या आणि निवडणुकीत येण्याच्या विचारात होते. त्यांच्या विचारानुसार जन लोकपाल विध्येयक बनवण्यासाठीचे प्रयत्न व्यर्थ जात होते. “India Against Corruption’ या आंदोनादरम्यान केल्या गेलेल्या सर्वेक्षणामध्ये राजकारणात प्रवेश करण्याच्या विचाराला व्यापक समर्थन मिळाले. पण या आंदोलनास राजकारणाशी जोडण्यास अण्णा हजारे सहमत नव्हते.

१९ सप्टेंबर २०१२ रोजी अण्णा हजारे आणि अरविंद केजरीवाल या निष्कर्षावर आले की, त्यांचे राजकारणात येण्या संबंधीत मतभेद संपुष्टात येणे अवघड आहे; म्हणून त्यांनी समान लक्ष्य असूनही वेगवेगळे मार्ग निवडण्याचा निश्चय केला. जन लोकपाल आंदोलनाशी जोडलेले मनीष सिसोदिया, प्रशांत भूषण आणि योगेंद्र यादव यांनी अरविंद केजरीवाल यांना साथ दिली. अरविंद केजरीवाल यांनी २ ऑक्टोबर २०१२ रोजी नवा पक्ष स्थापन करण्याची घोषणा केली. २६ नोव्हेंबर २०१२ रोजी भारतीय संविधान दिनाचे औचित साधून औपचारिक पद्धतीने आम आदमी पार्टी या नव्या राजकीय पक्षाची दिल्ली येथे स्थापना करण्यात आली. ‘झाडू’ निवडणूकीचं चिन्ह ठरलं. अरविंद केजरीवाल आम आदमी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बनले. आम आदमी पक्षाचे संक्षिप्त रूप ‘आप’ (AAP) हे आहे.

### १.२.१ ‘आपची’ ध्येय धोरणे– उद्दिष्टे :

१) भारतातील वाढता भ्रष्टाचार दूर करणे.

२) जनलोकपाल विधेयक संसदेत पारित करणे.

३) निवडणूक पद्धतीत सुधारणा करणे .

४) सत्तेचे विकेंद्रीकरण करणे.

५) पारदर्शक, कार्यक्षम, जबादारी व लोकाभिमुख शासन व प्रशासनावर भर देणे.

### १.२.२ आम आदमी पक्षाची विचारसरणी :

लोकवाद (Populism), धर्मनिरपेक्षता (Secularism), संयुक्त राष्ट्रवाद (Composite nationalism), समाजवाद (socialism) ही आम आदमी पक्षाची विचारधारा आहे.

२०१३ मधील दिल्ली विधानसभा निवडणूका आम आदमी पक्षाने 'झाडू' हे चिन्ह वापरून लढविल्या होत्या. या निवडणुकांमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शीला दीक्षित यांच्या नेतृत्वाखाली सताधारी काँग्रेस पक्षाला मोठ्या अपयशाचा (७० पैकी ०८) सामना करावा लागला. कोणत्याही एका पक्षाला बहुमत मिळाले नाही. व सर्वाधिक जागा जिंकलेल्या भाजपने दिल्ली विधानसभा निवडणुकीत ७० पैकी ३२ जागा मिळाल्यामुळे अल्पमतातील सरकार बनवायला नकार दिला. दिल्ली विधानसभा निवडणुकीत कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत (७० पैकी ३६ जागा) न मिळाल्यामुळे त्रिशंकू परिस्थिती निर्माण झाली. या निवडणुकीत आम आदमी पक्षाने ७० पैकी ६९ जागांवर आपले उमेदवार उभे केले होते. त्यांपैकी २८ जागांवर विजय मिळवून भारतीय जनता पक्षाखालोखाल आम आदमी पक्षाने दुसरा क्रमांक पटकावला. या निवडणुकीनंतर 'आप' ला प्रादेशिक पक्षाचा दर्जा मिळाला. अखेर काँग्रेसच्या पाठिंब्याने अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखाली २८ डिसेंबर २०१३ रोजी आम आदमी पार्टीचे सरकार स्थापन झाले. परंतु केवळ ४९ दिवस सत्तेवर राहिल्यानंतर केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला व विधानसभा बरखास्त करण्यात आली. जन लोकपाल बिल विधानसभेत मांडता आले नाही, म्हणून केजरीवाल यांनी राजीनामा दिला. विधानसभा बरखास्त करण्यात आल्यानंतर २०१५ साली पुन्हा नव्याने निवडणुका घेण्यात आल्या.

२०१५ च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीमध्ये ७० पैकी ६७ जागांवर विजय मिळवून आम आदमी पक्षाने बहुमत मिळवले. या निवडणुकीमध्ये आम आदमी पक्षाला ५४.३% मते मिळाली. तर भाजपास ३२.२% मते व ०८ जागा मिळाल्या, तर काँग्रेस पक्षास ०० जागा मिळाल्या. पाच वर्ष केजरीवाल यांच्या नेतृत्वात सरकारने उत्तम कामगिरी केली. त्यानंतर २०२० साली झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकांमध्ये ५३.५७% मते जिंकून आम आदमी पक्षाने बहुमत सिद्ध केले. या निवडणुकीत आप ६२, भाजप ०८, काँग्रेस ०० जागा मिळाल्या. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वात पुन्हा दिल्ली विधानसभेत 'आप' चे सरकार स्थापन झाले.

२०१३ पासून सत्तेवर येताच आम आदमी पक्षाने जनतेला दिलेल्या वचनाचे पालन करण्यास सुरुवात केली. दिल्ली येथे प्रत्येक विभागात ८०% पर्यंत भ्रष्टाचार कमी करण्यास सरकारला यश मिळाले. ५० भ्रष्ट अधिकाऱ्याना तुरुंगात पाठवण्यात आले. विजेच्या किंमती ५०% पर्यंत कमी करण्यात आल्या. खाजगी शाळांमधील म्यानेजमेंट कोटा बंद करण्यात आला. सर्व सरकारी रुग्णालयातील औषधे मोफत करण्यात आली. शिक्षण, आरोग्य, वीज, पाणी, महिला सुरक्षा व सम्मान, सार्वजनिक वाहतूक, जनहित योजना इत्यादींमध्ये लक्षणीय सुधारणा घडवून आणण्यात आल्या.

आम आदमी पार्टीच्या स्थापनेबाबतची डॉक्युमेंट्री (वृत्तचित्र) “An Insignificant Man’, २०१६ रोजी आनंद गांधी यांच्याद्वारे निर्देशित/ निर्मित केली गेली. आम आदमी पक्षाच्या कारकिर्दीत नजीब जंग या दिल्लीच्या नायब राज्यपालांनी दिल्ली सरकारमधील अनियमितता शोधण्यासाठी ‘शुंगलु समिती’ नेमली.

### १.२.३ आम आदमी पक्ष–राष्ट्रीय पक्ष :

केंद्रीय निवडणूक आयोगाने १० एप्रिल २०२३ रोजी आम आदमी पार्टीला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा दिला. आम आदमी पक्षाने ८ डिसेंबर २०२२ रोजीच्या गुजरात विधानसभा निवडणूक निकालात ५ जागा मिळवल्या होत्या. त्याचवेळी हे स्पष्ट झालं होत की आम आदमी पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळणार आहे. या निवडणुकीत भाजप आणि काँग्रेस नंतर तिसऱ्या क्रमांकाचे स्थान मिळविलेल्या ‘आप’ला १२.७% मते मिळाली ही मतांची टक्केवारी आपला लाभदायक ठरली. कारण या मतांच्या टक्केवारीवरच ‘आप’ चा राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

भारतीय जनता पार्टी, इंडियन नॅशनल काँग्रेस, बहुजन समाज पार्टी, कम्युनिष्ट पार्टी (CPM) आणि आम आदमी पार्टी या पाच पक्षांची ‘राष्ट्रीय पक्ष’ म्हणून सध्या निवडणूक आयोगाकडे नोंद आहे.

एखाद्या पक्षाला राष्ट्रीय दर्जा मिळवण्यासाठी निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या तीन महत्त्वाच्या अटींची पूर्तता करावी लागते, तेव्हाच त्या पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा बहाल केला जातो.

१) लोकसभेतील किमान २% जागा पक्षाने तीन वेगवेगळ्या राज्यांमधून जिंकलेल्या असाव्यात.

२) लोकसभेत ४ खासदार असावेत शिवाय ४ राज्यांमध्ये लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकीत किमान ६% मते मिळालेली असावीत.

३) किमान ४ राज्यांमध्ये पक्षाला राज्य पक्षाचा दर्जा असावा.

या तीनपैकी एका निकषाची पूर्तता केली, तरी पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळतो. या निकषांमधील दुसरा निकष म्हणजे किमान ६% मतांची अट आम आदमी पक्षाने गुजरात राजांमध्ये पुर्ण केली. त्यामुळे आम आदमी पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला. दिल्ली, पंजाब, गोवा या राज्यानंतर गुजरात या चौथ्या राज्यात वैध मतांपैकी सहा टक्क्यांहून अधिक मते आम आदमी पक्षाने मिळवून राष्ट्रीय पक्षाचा दर्जा निश्चित केला.

वरील निकषांची पूर्तता न केल्यामुळे तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय कम्युनिस्ट पार्टी (CPI) या पक्षांनी राष्ट्रीय पक्षाचा दर्जा गमावला.

### १.२.४ राष्ट्रीय दर्जा प्राप्त झालेल्या पक्षाला मिळणारे फायदे :

एखाद्या पक्षाला ‘राष्ट्रीय पक्ष’ म्हणून दर्जा मिळाल्यानंतर त्याला काही फायदेसुद्धा मिळतात. १) राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता असलेल्या पक्षाला देशभरात कुठेही निवडणूक लढवताना एकच चिन्ह राखीव मिळते. २) राष्ट्रीय दर्जा प्राप्त पक्षाला निवडणूक आयोग मतदारांची अपडेटेड यादी निवडणुकांपूर्वी पुरवत

तसचं ३) या पक्षांच्या नेत्यांना उमेदवारी अर्ज भरताना एकाच अनुमोदकाची आवश्यकता असते. ४) राष्ट्रीय पक्षाचा दर्जा प्राप्त असणाऱ्या पक्षास रेडीओ आणि दूरदर्शनवर प्रक्षेपणाची सोय पुरविली जाते. ५) राष्ट्रीय पक्षाला स्टार प्राचारकांची यादी वेगळ्याने काढण्याची मुभा असते. या यादीत जास्तीत जास्त ४० नेत्यांचा समावेश केला जाऊ शकतो. आणि या प्रचारकांच्या प्रवासाचा खर्च उमेदवारांच्या प्रचारासाठीच्या खर्चात मोजला जात नाही. ६) पक्षाच्या कार्यालयासाठी सरकारकडून सवलतीच्या दरात जमीन मिळवता येऊ शकते. हे सर्व फायदे आता आम आदमी पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा प्राप्त झाल्याने मिळतील.

आम आदमी पक्षाच्या यशाची/राजकीय कारकीर्दीची सुरुवात २०१३ सालच्या डिसेंबरमध्ये झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीतून झाली. तेथे ७० जागांपैकी २८ जागा आम आदमी पक्षाला मिळाल्या होत्या या निवडणुकी नंतर 'आप'ला प्रादेशिक पक्षाचा दर्जा मिळाला. २०१५ मध्ये गुजरातच्या सुरत महापालिका निवडणुकीत १२० पैकी २७ जागा जिंकून आम आदमी पक्षाने दुसरे स्थान पटकावले.

त्यानंतर २०२२ च्या सुरुवातीला पंजाबमधील विधासभा निवडणुकीत काँग्रेसचे मुख्यामंत्री चरणजीतसिंह चन्नी यांच्या नेतृत्वातील सरकारचा पराभव करून ११७ जागांपैकी ९२ जागा आम आदमी पार्टीने जिंकल्या आणि भगवंत मान यांच्या नेतृत्वात पंजाबमध्ये 'आप'चे सरकार स्थापन झाले. त्याचवेळी झालेल्या गोवा विधानसभा निवडणुकीत ४० जागांपैकी २ जागा 'आप' ने जिंकल्या. याशिवाय डिसेंबर २०२२ च्या गुजरात विधानसभा निवडणुकीत १८२ जागांपैकी ५ जागा 'आप'ने जिंकल्या.

महाराष्ट्र, छत्तीसगड, हरियाणा, झारखंड, कर्नाटक, मध्य प्रदेश, नागालँड, ओडीसा, राज्यस्थान, तेलंगणा, उत्तराखंड आणि उत्तर प्रदेश, या १२ राज्यांमध्येही आम आदमी पक्षाने गेल्या १० वर्षात झालेल्या विधानसभा निवडणुका लढवल्या, मात्र तिथे पक्षाला विजयी यश मिळाले नाही.

डिसेंबर २०२२ मध्ये झालेल्या दिल्ली महानगर पालिकेच्या निवडणुकीत २५० जागांपैकी १३४ जागा जिंकत (बहुमतासाठी १२६ जगाची गरज) या पालिकेतील भाजपची १५ वर्षाची सत्ता संपुष्टात आणली आणि दिल्ली महानगरपालिकेच्या महापौरपदी 'आप'च्या शैली ओबेरॉय तर उपमहापौरपदी मोहमदी इक्बाल विराजमान झाले.

देशातील आगामी लोकसभा निवडणुका (२०२४) च्या दृष्टीने भाजप विरोधी समविचारी पक्षांच्या दृष्टीने मंगळवार दि. १८ जुलै २०२३ हा दिवस अंत्यत महत्त्वाचा ठरला. कर्नाटकची राजधानी बंगरूळमध्ये भाजप विरोधी काँग्रेस व अन्य समविचारी पक्षांच्या दोन दिवसीय (१७ व १८ जुलै) बैठकीनंतर विरोधकांनी २६ पक्षांच्या आघाडीची घोषणा केली. त्या आघाडीचं नांव आहे "Indian National Developmental "Inclusive Alliance' (INDIA) म्हणजेच 'इंडिया'. आम आदमी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांनी बंगरुळच्या बैठकीत सहभाग घेत भाजप विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडी सोबत जाण्याचा निर्णय घेतला. आतापर्यंत कोणत्याही राजकीय आघाडीत सहभागी न होता स्वतंत्र निवडणुका लढविणाऱ्या केजरीवाल यांचा 'आप' पक्ष आगामी काळात 'इंडिया' या आघाडी सोबत एकत्रित निवडणुकांना सामोरे जाणार आहे.

## १.२.५ आम आदमी पक्षाची निवडणुकांमधील वाटचाल :

**दिल्ली विधानसभा निवडणुका (७० जागांपैकी)**

**तक्ता क्रमांक : १**

| वर्ष | आप | भाजप | काँग्रेस | अन्य |
|---|---|---|---|---|
| २०१३ | २८ | ३२ | ०८ | ०२ |
| २०१५ | ६७ | ०३ | ०० | ०० |
| २०२० | ६२ | ०८ | ०० | ०० |

**पंजाब विधानसभा निवडणुका (११७ जागांपैकी)**

**तक्ता क्रमांक : २.**

| वर्ष | आप. | बीजेपी शिरोमणी अकाली दल | काँग्रेस | बसपा | अन्य |
|---|---|---|---|---|---|
| २०१७ | २२ | १८ | ७७ | ०० | ०० |
| २०२२ | ९२ | BSP-०२<br>SAD-०३ | १८ | ०१ | ०१ |

विविध राज्यात २०२२ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत 'आप'ची वाटचाल.

**तक्ता क्रमांक : ३.**

| राज्य | आप | काँग्रेस | बीजेपी | अन्य पक्ष |
|---|---|---|---|---|
| गोवा (४० जागांपैकी) | ०२ | ११ | २० | मा.गो.पा.-०२<br>अपक्ष-०३<br>अन्य-०२ |
| गुजरात (१८२ जागांपैकी) | ०५ | १७ | १५६ | ०४ |

**लोकसभा, राज्यसभा मधील 'आप'ची सदस्य संख्या**

**तक्ता क्रमांक : ४**

| वर्षे | लोकसभा (५४३ पैकी) | राज्यसभा २५० पैकी |
|---|---|---|
| २०१४-१९ | ०४ | ०३ |

| | | |
|---|---|---|
| २०१९-२४ | ०१ | १० |

## १.३ सारांश :

एकंदरीत वरील विवेचनावरुन असे म्हणता येईल की, आज आम आदमी पक्ष भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचा राजकीय पक्ष म्हणून ओळखला जात आहे. शासकीय व प्रशासकीय क्षेत्रातील भ्रष्टाचाराला विरोध करत दिल्ली व पंजाब या राज्याची सत्ता हस्तगत केली. आणि पारदर्शक, कार्यक्षम, जबाबदार व लोकाभिमुख शासन व प्रशासनावर भर देत विकासाचं पर्यायी राजकारण करता येते हे दाखून दिले. म्हणून आज भाजप व काँग्रेस पक्षाला पर्याय म्हणून लोक आम आदमी पक्षाकडे पहाताना दिसत आहेत.

## १.४ पारिभाषिक शब्द व अर्थ:

१) **लोकवाद** (Populism) : लोकवाद या शब्दाचा अर्थ वेगवेगळ्या लोकांसाठी भिन्न गोष्टी किवा प्रत्येकासाठी सर्वकाही आहे.

२) **धर्मनिरपेक्षता** (Secularism) : म्हणजे राजकीय, नागरी किंवा सामाजिक व्यवहारात धर्म, धर्मविचार किंवा धार्मिक कल्पना यांना दूर ठेवणे.

३) **संयुक्त राष्ट्रवाद** (Composite Nationalism) : राष्ट्राप्रती निष्ठा आणि भक्ती, दुसरा अर्थ राष्ट्राप्रती, राष्ट्रातील सर्व समूहांप्रती सामुहिक / संयुक्तरित्या अभिमान आणि आपुलकीची भावना.

४) **समाजवाद** (Socialism) : व्यक्तिगत हितापेक्षा समाज हिताला प्राधान्य देणारी व्यवस्था. दुसरा अर्थ, समता व स्वातंत्र्य यांचा मेळ घालू इच्छिणाऱ्या उदारमतवादी लोकशाही संस्था मार्फत समताधिष्ठित समाज आणू इच्छिणाऱ्या विचार व कार्यक्रमास समाजवाद असे संबोधण्यात येते.

५) AAP- Aam Aadmi Party

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्न व त्याची उत्तरे

१) ........ रोजी औपचारिक पद्धतीने आम आदमी पक्षाची स्थापना केली.

अ. १९ सप्टेंबर २०१२ ब. २ ऑक्टोबर २०१२

क. २६ नोव्हेंबर २०१२ ड. २५ जानेवारी २०१२

२) आम आदमी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष ......... आहेत.

अ. अरविंद केजरीवाल ब. मनिष सिसोदिया

क. योगेंद्र यादव ड. प्रशांत भूषण

३) २०१३ च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत 'आप'ला.....जागा मिळाल्या.

अ. ५ ब. ८ क. २८ ड. ३२

४) २०१५ च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत 'आप'ला ...... जागा मिळाल्या.

अ. ६७ ब. ४१ क. ४५ ड. ८

५) २०२२ च्या पंजाब विधानसभा निवडणुकीत 'आप'ला .......जागा मिळाल्या.

अ. ९२ ब. २२ क. १८ ड. ८

६) २०२० च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत 'आप'ला .......जागा मिळाल्या.

अ. ६२ ब. ६५ क. २८ ड. १०

७) ..........रोजी केंद्रीय निवडणूक आयोगाने 'आपला' राष्ट्रीय पक्षाचा दर्जा दिला.

अ. १० एप्रिल २०२३ ब. १२ एप्रिल २०२३

क. १५ एप्रिल २०२३ ड. ८ डिसेंबर २०२३

८) पंजाब मध्ये 'आप'चे ............हे मुख्यमंत्री आहेत.

अ. भगवंत मान ब. अरविंद केजरीवाल

क. मनिष सिसोदिया ड. यापैकी नाही

९) दिल्लीत 'आप'चे ...... हे मुख्यमंत्री आहेत.

अ. अरविंद केजरीवाल ब. भगवंत मान क. मनिष सिसोदिया ड. सत्यंद्र जैन

१०) 'आप'चे निवडणूक चिन्ह .......हे आहे.

अ. झाडू ब. घड्याळ क. धनुष्य बाण ड. मशाल

- स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :-

१) क. २६ नोव्हेंबर २०१२ २) अ. अरविंद केजरीवाल

३) क. २८ ४) अ. ६७

५) अ. ९२ ६) अ. ६२

७) अ. १० एप्रिल २०२३ ८) अ. भगवंत मान

९) अ. अरविंद केजरीवाल १०) अ. झाडू

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

अ) आम आदमी पक्षाच्या राजकीय वाटचालीचा सविस्तर आढावा घ्या.

आ) टिपा लिहा.

१. 'आप'चा उदय व ध्येयधोरणे

२. 'आप' या राष्ट्रीय पक्षाविषयी माहिती लिहा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :

१) दामले निळू; अरविंद केजरीवाल, कार्यक्षम, महत्त्वाकांक्षी, वादग्रस्त, अनाकलनीय. : राजहंस प्रकाशन प्रा. लि. पुणे, आवृत्ती पहिली : जानेवारी –२०२३

**Online :**

1) Mr.m.Wikipedia. org

2) www .Google com/ amp/s/

3) www. Jagranjosh- com. translate.google com.

4) wwwbabushahi.com.

5) www.maharashtratimes.com.

6) www.hindustantimes.com.

❑❑❑